पुण्यनगरी

# शहाजी महाविद्यालयात 'उद्योजकता विकास' कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील वाणिज्य विभागामार्फत शिवाजी विद्यापीठ, अग्रणी महाविद्यालय योजना, डीआरके कॉलेज ऑफ कॉमर्स क्लस्टर अंतर्गत 'उद्योजकता विकास : आजची गरज' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. यामध्ये 'यशस्वी उद्योजकांची यशोगाथा' विषयावरील भित्तिपत्रिकेचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. एन. एस. जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच महाविद्यालयाच्या उपक्रमांची माहिती दिली. प्रथम सत्रात डॉ. ए. एम. गुरव यांनी उद्योजकता विकासविषयी मार्गदर्शन केले. आभार प्राध्यापक एस. एच. कांबळे यांनी मानले.

03 FEB 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाने दिला बेटी बचाओचा वसा

## राज्याला पथदर्शी अभियान › अन्य राज्यांतील विद्यापीठांकडून साधला जातोय संपर्क

कोल्हापूर : अनुराधा कदम

सतत मुलीच जन्माला घालते म्हणून पत्नीचा खून करणारा पती, तिसरी मुलगी झाल्याने भ्रूण कचऱ्यात टाकणारी आई, गर्भलिंग निदान, गर्भपातासाठी बक्कळ पैशाच्या आमिषापोटी फोफावलेले कसाई डॉक्टर, मुलगाच हवा या दबावाला कंटाळून छळ सोसणाऱ्या महिला हे वास्तव दिवसेंदिवस दाहक होत आहे. अशा वातावरणात मुलगी नको ही मानसिकता बदलण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने राबवलेले बेटी बचाओ हे अभियान महाराष्ट्रासाठी पथदर्शी ठरत आहे. आजची युवा पिढी उद्याची पालक असल्यामुळे तरुणाईमध्ये 'लेक वाचवा' हा विचार रुजवण्यासाठी सकारात्मक पाऊल टाकणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.




कोल्हापूर : बेटी बचाओ अभियानात सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनी.



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सन २०१६ मध्ये 'बेटी बचाओ' या अभियानाला सुरुवात करण्यात आली. या अभियानाची जबाबदारी समाजशास्त्र विभागाकडे सोपवण्यात आली. या अधिविभागातील प्रा. प्रतिभा देसाई समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळांतर्गत बेटी बचाओ अभियानासाठी दर वर्षाला २ लाखांचा निधी मंजूर केला जातो. लेक वाचवा या मध्यवर्ती संकल्पनेच्या आधारे पथनाट्य, स्पर्धा, घोषवाक्य, अभिवाचन, कार्यशाळा, व्याख्याने, परिसंवाद अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. गेल्या सहा वर्षांत या अभियानांतर्गत ५०० उपक्रम राबवण्यात आले आहेत.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्न कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांतील २३७ महाविद्यालयांमधील दोन लाखांहून अधिक विद्यार्थी बेटी बचाओ ही हाक देण्यात सक्रिय झाले आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठातील ४५ अधिविभागांसह मानव्यशास्त्र विषयातील संशोधन प्रकल्पांमध्येही बेटी बचाओ अभियानाशी निगडित संशोधनावर भर देण्यात आला आहे. परिणामी, देशातील अन्य राज्यांतील काही अकृषी विद्यापीठांतर्फे शिवाजी विद्यापीठाचा आदर्श घेत बेटी बचाओ अभियान राबवण्यासाठी समन्वय साधला जात आहे.

> मुलीचा जन्म नाकारणे ही सध्याची ज्वलंत समस्या बनली आहे. या समस्येचे मूळ उपटायचे असेल तर युवा विद्यार्थ्यांमध्ये मुलीला समान स्थान देण्याचा विचार रुजणे आवश्यक आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेले बेटी बचाओ अभियान परिणामकारक ठरले आहे. पुणे, सोलापूर, नाशिक, जळगाव या जिल्ह्यांतील विद्यापीठे व महाविद्यालयांमधून बेटी बचाओ अभियानाची संकल्पना समजून घेण्यासाठी समन्वय साधला जात आहे.
>
> *-प्रा. प्रतिभा देसाई, समन्वयक, बेटी बचाओ अभियान, शिवाजी विद्यापीठ*

### राज्यातूनही प्रतिसाद

गर्भलिंग निदान, तसेच स्त्रीभ्रूण असेल तर गर्भपात करण्याच्या घटना वाढत आहेत. महाराष्ट्रातील अनेक राज्यांमध्ये या घटनांनी प्रशासन, पोलिसांसमोर आव्हान उभे केले आहे. यातूनच बेकायदेशीर गर्भपात, महिलांचे शोषण व बोगस डॉक्टर हे नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. लिंग गुणोत्तराच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे भारतात २२ व्या स्थानी आहे. एक हजार मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण ९२५ इतके चिंताजनक बनले आहे. राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा यासह पुणे, नाशिक, सोलापूर या शहरांतही मुलगी नको ही मानसिकता समाजमनात रुतून बसली आहे. हे चित्र बदलायचे असेल तर आज विद्यार्थिदशेत असलेल्या तरुणांनी भविष्यात सुज्ञ पालक होण्यासाठी मुलगा-मुलगी भेद न करता मुलीच्या जन्माचे स्वागत केले पाहिजे, या हेतूने या अभियानाला शिवाजी विद्यापीठाने सुरुवात केली. महाराष्ट्रातील काही विद्यापीठांनाही या अभियानाचे महत्त्व समजले असून, त्यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानाचा आदर्श घेतला जात आहे.

सकाळ

# भगवान महावीर अध्यासनास पाटील यांची देणगी

कोल्हापूर : येथील सुरगोंडा पाटील यांनी त्यांच्या आई लक्ष्मीबाई जनगोंडा पाटील यांच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी २५ हजार रुपयांची बृहत देणगी दिली. त्याबद्दल या अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी त्यांचा ग्रंथ देऊन सत्कार केला. या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पाटील यांचे आभार मानले.

सकाळ

# मराठी भाषा विभागातर्फे 'लेखक संवाद'

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागातर्फे 'लेखक संवाद' कार्यक्रम झाला. या अंतर्गत प्रा. प्रशांत गायकवाड यांनी प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांच्याशी संवाद साधला.

याप्रसंगी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, अर्जुन देसाई, विजयसिंह यादव पेठ वडगाव महाविद्यालयातील विद्यार्थी व मराठी विभागातील संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

तरुण भारत

# विद्यापीठातील स्तुती कार्यक्रमात मान्यवरांचे मार्गदर्शन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात स्तुति कार्यक्रम अंतर्गत गेल्या तीन दिवसापासून विविध तज्ज्ञ प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. बुधवारी सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहभोजनाचा आनंद सहभागी संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी घेतला. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्रांतर्फे स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमात आधुनिक उपकरण हाताळण्याची संधी संशोधकांना मिळाली. त्याबद्दल डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे सहभागींनी आभार मानले.

स्तुती प्रशिक्षणाच्या तिसऱ्या दिवशी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे डॉ. तुकाराम डोंगळे यांनी 'मेमरिस्टोर बेस्ड रेस्टीस्टीव मेमरी आणि आर्टिफिशअल सिनॅप्टिक डिवायसेस" या विषयावर मार्गदर्शन केले. या रसायनशास्त्राचे डॉ. देव भांगे यांनी 'एक्स रे डिफ्रॅक्शन" या उपकरणावर मार्गदर्शन केले. तर सायंकाळी डॉ. सोनकवडे यांनी



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्तुती कार्यक्रमात डॉ. देव भांगे यांचा सत्कार करताना तुकाराम डोंगळे.**

सहभागींना आधुनिक उपकरणांची प्रात्यक्षिके दाखवत, संशोधकांच्या संशोधनाचे सॅम्पल तपासून दिले. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये गाण्यांची मैफिल रंगली होती. तसेच इतर राज्यातील सहभागी प्राध्यापक, विद्यार्थ्यांना कोल्हापुरची माहिती व्हावी म्हणून कोल्हापूर दर्शनचे आयोजन केले आहे. डॉ. सोनकवडे यांनी प्रयोग शाळेत आधुनिक उपकरणांची केलेली जपणूक पाहून स्तुती कार्यक्रमातील सहभागी प्राध्यापकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.